।। विद्या परं दैवतम्।।

SHIKSHAN PRASARAK MANDAL'S

**S. P. M. Tatyasaheb Mahajan Arts & Commerce College,**

CHIKHLI Dist. Buldana - 443 201 (M.S.) Fax No. (07264) 242075

Website : spmtmchikhali.org. E-mail - principaldrtarespmchikhli@gmail.com

# इतिहास विभाग

# सर्वेक्षण अहवाल

## सत्र - 2019-20

## " चिखली तालुक्यातील पुरातन मंदिरांचा ऐतिहासिक अभ्यास "



*** सर्वेक्षण समन्वयक ***

**प्रा.डॉ.सुरेश सं.माळशिरवरे**

*** मार्गदर्शक ***

**प्राचार्य.डॉ.सुभाष ज्ञा.गव्हाणे**

शि.प्र.मं.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय,

चिखली. जिल्हा - बुलडाणा - ४४३२०१

शि.प्र.मं.भास्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय

चिखली जिल्हा बुलढाणा

# इतिहास विभाग

सर्वेक्षण अहवाल सत्र २०१९-२०

## ' चिखली तालुक्यातील पुरातन मंदिरांचा ऐतिहासिक अभ्यास '

सर्वेक्षण मार्गदर्शक

प्रा.डॉ.सुरज म.मानकिरकर

**सर्वेक्षक विद्यार्थी**

| | | |
|---|---|---|
| १) | संकेत भूपेंद्र जाधव | बि.ए.भाग.II |
| २) | शिवानी मदन इंगळे | बि.ए.भाग.II |
| ३) | निलेश गजू पाटील | बि.ए.भाग.II |
| ४) | संजीवनी मदन काळे | बि.ए.भाग.II |
| ५) | अपूर्वा विजय जाधव | बि.ए.भाग.III |
| ६) | प्रतिभा किशोर जाधव | बि.ए.भाग.III |
| ७) | प्रिया जनार्दन शिवणे | बि.ए.भाग.III |

# सारांश

भारत एक प्राचिन सभ्यताओं से परिपूर्ण देश हैं ।और इस देश की वास्तुए उनके अवशेष यहाँ की सभ्याताएइस बात का हमे प्रतिक देती है। इनमे हिंदु सभ्यताओं का जो मुल प्रतिक है हमारे मंदिरके इस शोध कार्य में चिखली जिला बुलडाणा के पुरातन मंदिरो का अध्ययन किया गया है। तथा सांस्कृतिक,अध्यात्मिक और पुरातन शिल्पकलाओं का अध्ययन किया गया है ।इस शोध कार्य में बुढे जानकार तथा स्थानिक लोगों का तथ्य संकलन में महत्वपूर्ण योगदान रहा है ।

मंदिरोके बारे मे हमने जानने का प्रयास कीया है बुलडाणा जिला जिजामाता जनमस्थान, लोणार सरोवर इनके लिए प्रसिध्द हैं। चिखली शहर जिलेमे का सबसे बडा लोकसंख्या वाला और बडा शहर है सातसात चिखली जिलेमे का सबसे बडा व्यापारी केंद्र है ।

पर इस तहसिल में सभ्यताओं का पालन बडे गर्व से किया जाता है । और ये हमने हमारे मंदिरो में देखा की लोग कैसे आते है ।कैसे वो भावनिक रुप से उन मंदिरोसे जुडे हुये हैं ।गांभिर्यतासे प्रयास करने के बाद में हमने ये जाना की,मंदिरो के बारे मे श्रध्दाओके साथ साथ अंधश्रध्दा का भी वास रहता है।

पर विज्ञान के आधार पर जो हमारे लिए अंधश्रध्दा हैं ।वो श्रध्दा के रुप मे विकसीत होती है उन लोगो मै जो उसका बंद आँखसे पालन करने का काम किया हैं ।

जैसे की हमने सातगाव भुसारी के विष्णू मंदिर के बारे मे देखा धार्मिक ध्रुवीकरण के कारण इतनी सुंदर रचना अकेले ओस पडी हुई है।

यह धार्मिकता लोगो का जिवन सुधार भी सकती है ।धर्म का काम मानव को दिशा प्रदान करना है ।और ये दिशा प्रदान करने मे मंदिरोकी बडी भूमिका है ।



Ancient Hemadpanthi Temple - Satgaon Bhusari
Tq.Chikhli. Dist.Buldana.




Ancient Hemadpanthi Temple - Sakegaon,
Tq.Chikhli. Dist.Buldana.




**Ancient Temple of Ballal Devi - Amdapur. Tq.Chikhli. Dist.Buldana.**



**Shiva's Ancient Temple - Amdapur, Tq.Chikhli. Dist.Buldana.**



RenukaMata Temple Tq.Chikhli. Dist.Buldana.



Tapovan Devi Temple- Rohada Tq.Chikhli. Dist.Buldana.

# १) प्रस्तावना

मंदिर म्हणजे ज्या दिवशी ज्या ठिकाणी मनाचे व्दार उघडते अशी जागा होय.आजपासून जवळ जवळ १४०० कोटी वर्षापूर्वी या विश्वाची उत्पती झाली ४५० कोटी वर्षापूर्वी पृथ्वी निर्माण झाली. पहिला जिव ३८५ कोटी वर्षापूर्वी निर्माण झाला तर ७० कोटी वर्षापूर्वी गुंतागुंतीचे जिव निर्माण झाले.२३ कोटी वर्षापूर्वी डायनासोर्स जन्मले आणि त्यानंतर २७ कोटी वर्षानंतर ४५ लाख वर्षांपूर्वी मानसासारखा प्राणी अवतरला आणि १ लाख वर्षापूर्वी मानूस निर्माण झाला.त्यात मानसाची हजारो वर्षे कंदमुळे,फळे वेचण्यात आणि शिकारीतच गेली.त्यावेळी पैसा शेती त्यातल काहिच नव्हत.हा झाला प्राथमिक इतिहास.त्यानंतर माणुस टोळया करुण राहू लागला.टोळया करुन राहत असतांना माणसाला भाषा हि अवगत झाली.भाषा अवगत झाल्यानंतर विचार आचारांची देवाण घेवाण होवू लागली.अनेक टोळया मिळून मिसळून समाज तयार होवू लागला आणि त्या समाजाला एकत्रीत बांधुण ठेवण्यासाठी त्यांना समविचारी बणविण्यासाठी त्यांनी एकत्रीत होवून एका ठिकाणी जमविण्यासाठी एका वास्तुची गरज भासू लागली.

भारतीय संस्कृतीत मंदिरांचा फार मोठा वाटा असल्याचे आपल्या जाणून येतो.सांस्कृतीक आणि पारंपारिक अध्यात्माची पिढयान पिढया येथे जपवणूक आणि विचारांची आदान प्रदानता येथून होतांना आपल्याला दिसून येते.

त्याच प्रमाणे मंदिरे हे राजे महाराजे लोकांचे खजिना ठेवण्याचे ठिकाण सुध्दा होते.येथे सोने,चांदी,जड जवाहार असे अनेक मौल्यवान दागीने रत्न सापडले यांची फक्त निव्वळ किंमत हि अनेक पट जास्त आहे.कारण ही किमंत तिथल्या ज्या सापडलेल्या वस्तु आहेत.त्यांची सांस्कृतीक पूरातत्वीय किमंत वगळता घेण्यात आलेले आहे.

याप्रकारे राजे महाराजे काही विशिष्ट धर्मातील लोक यांनी मंदिरांचा उपयोग हा बहूआयामी पध्दतीने केलेला आपल्याला आढळून येतो.

हाच आपल्या प्रकल्पाचा खरा उद्देश आहे की कल्पकता आणि वास्तविकता यामध्ये कुठला फरक आपल्याला दिसून येतो.आणि मानवंश शास्त्राच्या आधारे अश्या वास्तूंची निर्मीती होऊ लागली असे जाणवते.

' बिल गेट्स ' असे म्हणतो कि भारत हा गरीबांचा श्रीमंत देश आहे.या देशातल्या फक्त मंदिरांच्या घंटया काढून जरी विकल्या तरी हा देश महासत्ता होईल.तर आपल्या या प्रकल्पाचा उद्देश मंदीरे त्यांचा इतिहास त्यांचे महत्त्व आणि वास्तविकता हे जाणून आहे.

## ३) व्याप्ती आणि मर्यादा

चिखली तालुक्यातील पुरातन मंदिरांचा अभ्यास करण्यात आला असून यामध्ये ०६ गावातील ०६ मंदिरांचा समावेश करण्यात आला आहे.

त्याचे शिखर सद्या अस्तित्वात नाही याचा आढावा घेता गावातील नागरिक असे सांगतात की, पूरांणामध्ये विश्वकर्मा हे फार मोठे अभियंता होते ते रात्रीच बांधकाम करायचे आणि पहाट होता जेवढे काम झाले तेवढेच सोडून देवून निघुन जायचे हे मंदिर सकाळ होताच ते शिखरापर्यंत पोहचले असतांना त्यांनी तिथपर्यंत काम करुन बाकी काम अपूर्ण ठेवले.

## हे मंदिर का बांधल्या गेले

अशी कल्पना आहे की राम-सिता जेव्हा वनवासाला जात होते तेव्हा त्यांनी त्या ठिकाणी मुक्काम केला व सिताने जे शक्ति मंदिर आहे तेथे अंघोळ केली होती.

अश्या प्रकारे ते साकेगाव येथे सुध्दा थांबले होते.त्यामुळे तिथेसुध्दा अश्या प्रकारचे मंदिर हे बांधले असल्याची कल्पना आहे.

## प्राचीन विष्णू मंदिर

सातगाव हे अतिशय सुंदर गाव आहे आणि त्यात भर म्हणजे या गावातील मंदिरे ही त्या गावाची शोभा वाढवितात सद्यस्थितीत तिन मंदिरे असलेले हे गाव त्यातील कलात्मकतेचा अत्यंत उत्कृष्ट नमूणा म्हणजे हे विष्णू मंदिर होय.

या मंदिराला तेवढे आदराचे स्थान गावकऱ्यांमध्ये नसल्याचे आढळून येते.याबद्दल अनेक कल्पना आहेत.की हे बौध्द मंदिर आहे तसेच जैन मंदिर आहे.या मंदिरामध्ये कुठल्याही देव-दैवतांची मुर्ती आपल्याला दिसत नाही.मंदीराचे बांधकाम अत्यंत कलात्मक आणि उत्कृष्ट सौदर्याचा नमुना आहे.पायापासून तर मंडपापर्यंत अतिशय मनमोहक कारागीरी आपल्याला दिसून येते.विष्णू मंदिराचे बांधकाम चार छतांमध्ये झालेले आपल्याला दिसून येते.त्याचे वर्गीकरण प्रामुख्याने शिखर मोठे छत समोरची जागा महामंडप नंतर मंडप व त्यानंतर अर्धमंडप असे होय.

विष्णू मंदिरावर अनेक बौध्द जैन आकृत्या आणि कोरीव मुर्त्या आपल्याला दिसून येतात. त्यामध्ये काही ज्या कोरीव मुर्त्या आहेत त्यामध्ये छेडछाड केल्याचे चित्र आपल्याला दिसून येते.अनेक बौध्द मुर्त्या तसेच ध्यानस्त बसलेले जैन मुनी यांच दर्शन आपल्याला घडून येते.

.....६

## विष्णू मंदिराची अवस्था

प्रामुख्याने या मंदिरामध्ये मुर्ती आपल्याला आढळत नाही फक्त मुनीचे पाय आपल्याला दिसुन येतात.मंदिराच्या बाहेर अनेक तुटलेल्या अवस्थेत असलेले अवशेष आपल्याला आढळून येतात. मंदिराच्या बाहेर अनेक मुर्त्या दिसनू येतात.त्यात प्रामुख्याने भगवान बुध्दाच्या उभ्या असलेल्या मुर्त्या आपल्याला दिसून येतात.अनेक देवी देवतांच्या तुटलेल्या अवस्थेतील मुर्त्या आपल्याला दिसून येतात. गणपती आणि अनेक हिंदू देवी देवतांचे यांचे प्रत्यय दर्शन आपल्याला घडून येते.शिखर व्दारच्या प्रवेशावर अतिशय दुर्मिळ असा Black River Marble ची चौकट तयार केलेली दिसून येती.

मंदिराच्या प्रवेशव्दारावर मोर,हत्ती असे अनेक प्राणी कोरीव स्वरुपात आपले स्वागत करतांना दिसून येतात.अवकाश ब्रम्हांड हे कला प्रकाराचे आहे याचे दर्शन छतावर आपल्याला दिसून येते. मंदिराचे जे कोरीव काम आहे त्याला आजच्या तंत्रज्ञानयुक्त अभियांत्रीकी सुत्राकडून सुध्दा मात देणे कठीण दगडे एकावर एक अखंडपणे रचून या मंदिराचे बांधकाम पूर्ण केल्याचे आपल्याला दिसून येते.Carbon Dating ची पध्दत वापरुन जे दगडांचे वय निघाले ते कमीत कमी ५ लाख वर्ष जुने निघालेले आहे.एक फार सुंदर घोडयावर बसलेली हातात भाला घेतलेल्या स्त्रीचे शिल्प येथे आढळून येते.असे म्हणतात की हे शिल्प झांशीच्या राणीचे आहे.

१२ व्या शतकातील दिगंबर पंथातील पार्श्र्वनाथाची मूर्ती सुध्दा बघायला येथे मिळते.विष्णू मंदिर हे भव्य आहे तिथे प्रामुख्याने महामंडप,मंडप आणि अर्धमंडप हे उघडया स्वरुपात आहेत.१२ खांबावर हे तिन कक्ष उभे आहेत.आणि त्या खांबावर सुंदर नक्षिकाम केलेले आहे.मंडपाच्या चौबाजुला सुंदर कलांचे नक्षिकाम केले असल्याचे आपल्याला जाणवते.अशाप्रकारे आपल्या नजदीकच अतिशय उत्कृष्ट असे मंदिर आपल्याला बघायला मिळते.

# बल्लाळ देवी संस्थान अमडापूर

बुलडाणा जिल्हयातील चिखली तालुक्यात अमडापूर गावामध्ये एक सुप्रसिध्द व खुप प्राचीन असे मंदिर आहे.

हे मंदिर अतिशय मनमोहक निसर्गरम्य वातावरणात एका टेकडीवर वसलेले आहे.या ठिकाणची देवी पांडवकालीन आहे असे तिच्या एकंदरीत रचनेवरुन दिसते.या ठिकाणच्या प्राप्त माहितीनुसार असे कळते की, पांडव ज्यावेळी अज्ञातवासात होते त्यावेळी ते या ठिकाणी म्हणजे देवीजवळ काही दिवस वास्तव्यास होते.त्यावेळी मंदिर अस्तित्वात नव्हते फक्त दगडाची खुप मोठी मुर्ति त्यावेळी या ठिकाणी होती हे आपल्याला त्या ठिकाणी असलेल्या देवीच्या अवशेषावरुन दिसून येते.त्या अवशेषांचा आधार घेऊन **Mapping** ची पध्दत वापरुन ती जी अखंड मुर्ति होती ती जवळ जवळ ५१ फुटांची असावी असा अंदाज लावता येतो.

मोठया कालावधीनंतर म्हणजे १६ व्या ते १७ व्या शतकामध्ये मोगलांचे आगमन महाराष्ट्रात झाले त्यांच्या आगमनानंतर त्यांनी हिदूं संस्कृतीवर धार्मिक हल्ला चढवला हिंदू लोक हे मंदिरा सोबत भावनिक रित्या जोडलेले होते.

मुगलांना कर्मकांडे,देवपुजा,मुर्तीपुजा हे थोतांड वाटायचे ते इथल्या लोकांचा विटाळ करायचे व विटाळ करण्याचे कारण म्हणजे हिंदु संस्कृतीमधील अंधश्रध्दा,वाईटप्रथा उदा.सतीप्रथा,पडदापध्दती आणि अश्या अनेक त्यामुळे त्यांनी राज्य करण्यासाठी फोडा आणि राज्य करण्याची निती अवलंबीली होती.म्हणून ते मंदिराची तोडफोड करीत तेथील मूर्त्या उध्वस्त करीत त्याच वेळी मोगलांनी या जगदंबा देवीच्यामूर्तिची देखील तोडफोड केली.

खंडो बल्लाळ हे संभाजी राजांचे खनिजदार होते.खंडो बल्लाळ यांनी या देवीचा जिर्णोध्दार केला.या देवीच्या मुखवटाची स्थापना ही खंडो बल्लाळ यांच्या हस्ते झाली.बल्लाळ यांनी स्थापना केल्यामुळे या देवीचे नाव बल्लाळ देवी असे पडले व पुढे तेच नाव रुढ झाले.

१७ व्या शतकात बल्लाळ यांनी मुखवटाची स्थापना केल्यानंतर मंदिर सुध्दा बांधले. खंडो बल्लाळ यांच्या मुत्युनंतर कालातंराने या मंदिराकडे दुर्लक्ष झाले मंदिर गावाबाहेर व टेकडीवर असल्या कारणाने तेथे कुणीही फिरकत नव्हते तद्‌काली देवीच्या मुखवटाला शेदुंर लावलेला होता.मंदिराची  निगा नसल्या कारणाने तेथे उंदीर घुसा यासारख्या प्राण्यांनी तिथे आपले राज्य प्रस्थापीत केले.व शेंदुरामुळे देवीचा मुखवटा पुर्णपणे पोखरुन काढला.

त्यांनतर खुप कालावधीनंतर अमडापूर येथील तेजराव देशमुख यांनी १९८४ मध्ये पोखरलेल्या अवस्थेत असलेल्या मूर्तीचे त्यांनी विसर्जन केले व या ठिकाणी नवीन मूर्तीची स्थापना केली. या कार्यासाठी त्यांना गावातील लोकांचा खुप मोठा आधार व पाठींबा मिळाला गावातील लोकांनी मूर्ती स्थापनेसाठी व मंदिरासाठी जशी शक्य होईल त्याप्रमाणे मदत केली.कोणी श्रमदान करुन मदत केली तर कोणी वित्तदान करुन व खुप चांगल्या प्रकारे सर्वांच्या सहकार्यांने मंदिराची डागडुजी व मूर्तीची स्थापना झाली.

## मंदिराची रचना

हे मंदिर खंडो बल्लाळ यांनी बांधलेले आहे.हे मंदिर बांधण्यासाठी ज्या विटांचा वापर केलेला आहे.त्या अतिशय हलक्या स्वरुपाच्या आहेत.या मंदिराची रचना मशिदीसारखी आहे.दुरुन बघीतल्यावर ते मशिदीसारखे प्रत्ययरुपी भासते.

त्यावेळी परकिय मुगल आक्रमणापासून बचाव होण्यासाठी याची रचना मशिदीसारखी केली असावी.हे मंदिर उंचटेकडीवर निसर्गाच्या सानिध्यात स्थापीत आहे.

# तपोवन देवी संस्थान रोहडा

तपोवन हा मुक शब्द 'तप ' या शब्दापासून आलेला आहे.तप म्हणजे प्रायश्चित करणे.तप हा मुळता अध्यात्मिक ध्यान जाण्यासाठी केला जातो आणि दुसरा शब्द वन म्हणजे जंगल किंवा गर्द झाडी होय.या दोन मुळ शब्दापासून तपोवन हा शब्द तयार झाला आणि याचा एकंदरीत अर्थ असा होतो की, अध्यात्मिकतेच्या अवस्थेपर्यंत पोहचण्यासाठी वनात जावून प्रयत्न करणे होय.

इ.स.१६०० पूर्वी चिखली देऊळगावराजा मार्गावरील रोहडा येथे चिखली येथील रेणूका माता मंदिराची स्थापना करणाऱ्या स्वामी बचानंद यांचे शिष्य नारायण स्वामी यांनी तपोवन देवीची स्थापना केली.त्याकाळी परिसरातील दुर्गम असलेल्या तपोभुमीमुळे या देवीला तपोवन देवी असे नाव पडले.सिंदखेड राजाचे लखुजीराजे अर्थात जिजाऊंचे पिताश्री लढाईसाठी निघण्यापूर्वी याच मंदिर परिसरात त्याचां मुक्काम असे.अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी असणारे तपोवन देवीचे मंदीर सुरडकर कुटुंबियांच्या ताब्यात होते.मुगल बादशाहाने सुरडकर कुंटूबियांना देशमुखी बहाल केली होती.तेव्हापासून सदर मंदिर वंशपरंपरने त्यांच्या ताब्यात होते.१२ मार्च १९८४ रोजी परिसरातील भाविकांनी न्यायालयीन लढाई जिकूंण मंदिराचा ताबा घेतला.

# रेणूका देवी मंदिर चिखली

लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या रेणूका देवीचे मंदिर चिखलीच्या ऱ्हदयात म्हणजे अत्यंतमध्यभागी वसलेले आहे.सार्वभौमत्व वाढीच्या काळात धर्म व त्यांचे महत्व हे कमी होतांना दिसून येते.

परंतु ज्याप्रमाणे आपण आंतरगाभ्यात जावून सत्याची आस शोधतो तर आज याचे आकर्षन आपल्याला वाढतांना दिसून येत.पुरातन चिखलीला तिची ओळख या मंदिरामुळे प्राप्त झाली.मंदिराचा इतिहास फार प्राचीन आहे.अगदी वेदांपासून आपल्याला रेणूकादवी परशूराम यांचे सुगावे मिळतात.हे मंदिर अत्यंत सुंदर व आकर्षक आहे.मंदिराचे बांधकाम हे नव्याने सुध्दा पार पडत आहे.मंदिराच्या शिखरावर अनेक देवी देवता संत यांच्या मूर्त्या आढळून येतात.विशेष करुन गौतम बुध्दांच्या मूर्तीचेही दर्शन आपल्याला येथे घडून येतांना दिसते.

## मंदिराचा प्राप्त इतिहास व मिरवणूक

लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या आदिशक्ती आई रेणूका देवीचा यात्रा महोत्सव दरवर्षी चैत्र पौर्णिमेला साजरा होत असतो.या निमीत्ताने शहरात सर्वत्र उत्साह व भक्तीमय वातावरण पाहावयास मिळते संस्थानाच्या वतीने वासंतीक नवरात्रोत्सवाची सुरवात होत असते.सुमारे दिडशे वर्षाची परंपरा असलेल्या रेणूका देवी वहन मिरवणूकीची आस भाविकांना लागली आहे.दरवर्षी मोठया उत्साहात भरणाऱ्या या यात्रेचे आकर्षन तालुक्यासह परिसरातील गाव खेडयांनाही असते.

रेणूका देवीचे मंदिर हे शहराच्या वैभवात भर घालून देते. पौराणिक काळापासून रेणूकादेवीचे मुळस्थान चिखली हे असून आदि शक्तीचे सर्वश्रेष्ठ शक्तीपीठ म्हणून सर्वत्र प्रसिध्द आहे.महान तपस्वी बचानंद महाराज यांच्यानंतर त्यांच्या शिष्यानीही मंदिराचे काम पाहीले.कालातंराने मंदिराच्या व्यवस्थापनासाठी विश्वस्त मंडळाची नेमणूक झाली.तेव्हापासून अविरतपणे विश्वस्त मंडळामार्फत दरवर्षी वासंतीक नवरात्रोत्सवा निमित्त यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

त्याअनुषंगाने रेणूका देवी मंदिरात घटस्थापना झाली असून दररोज भजन, आरती ,गिता पण सुरु आहे.तसेच सकाळ सायंकाळ आरती, नामस्मरण आदी कार्यक्रम भक्तिपूर्ण वातावरणात पार पडत आहेत.

यात्रेच्या अगोदरच्या काही दिवसा पासून सायंकाळी गळकरी ,वगदी प्रदक्षिणा, झेंडा मिरवणूक ,नवसपूर्ती भंदे मिरवणूक काढण्यात येत यात्रेच्या दिवशी रेणूका देवीला प्रात:काळ अभिषेक व नवरात्र उत्सव शेलुदवासीयांचे मानाचे पातळ,खण,गळकरी वगदी प्रदक्षिणा नवसपूर्ति झेंडा मिरवणूक,ऑटोरिक्षा,टॅक्सी,बियाणे महामंडळ,बाजार समिती,अडतमाल,एस.टी. आगार आदी संघटनेच्या वतीने झेंडा मिरवणूकीसह खण पातळ अर्पण वाहनावरील देवीला पातळ व खण अर्पण चर्मकार बंधु भगिंनीची चित्तथरारक जिव्हा त्रिशुलधारी मिरवणूकीसह नवसपूर्ती व दिवसभर शहरातील विविध पतसंस्था, बँक, मित्रमंडळ,गणेश मंडळ,व्यापारी संघटनांकडून ठिकठिकाणी प्रसादाचे वितरण तर रात्री या यात्रेचे मुख्य आकर्षन म्हणजे आई रेणूकादेवीच्या अष्टभुजा प्रतिमेची भव्य मिरवणूक निघत असते.

# साकेश्वर मंदिर साकेगाव

साकेगाव हे चिखली -धाड रोडवरील एक गाव आहे.साकेगाव हे चिखलीपासून जवळ जवळ १० किमी अंतरावर आहे.साकेगाव चे हेमाडपंथी मंदिर हे गावकरी आजुबाजूच्या गावातील लोक यांचे श्रध्दास्थान हजारवर्षाहूनही प्राचीन मंदिराची उत्तम सोय, देखभाल असल्यामुळे आज ते सुरक्षीत अवस्थेत आहे. आणि आजही मंदिराची स्थिती अत्यंत उत्तम आहे.

हे मंदिर गावाच्या बाहेर परंतु मुख्य रत्स्यापून काही अंतरावर आहे.परंतु रस्त्यावरुन जात असतांना त्याची अत्यंत मनमोहक अशी प्रतिमा आपले लक्ष त्याकडे वेधून घेते हे मंदिर स्वतःमध्येच कलाकृतीचा अत्यंत उत्कृष्ठ नमुना आहे.

## मंदिराची रचना

मंदिराची प्रवेशचौकट ही आयातकृती शिल्पामध्ये बनवलेली आहे.एकावर एक अनेक दगडे एकमेकांमध्ये रचुन ही प्रवेश चौकट बनविण्यात आलेली आहे.३ Feet x २ Feet या आकाराच्या प्रत्येकी दगड आपल्याला तेथे बघाववयास मिळतो.बेसाल्ट खडकामध्ये मंदिराची उभारणी झालेली आपल्याला दिसून येते.जेव्हा त्या काही लांब काळापर्यंत टिकणाऱ्या वास्तु असतात त्यापूर्णतः बेसाल्ट खडकामध्ये उभारलेल्या आपल्याला दिसून येतात ही वास्तुही त्याला अपवाद नाही असे आपल्याला जाणून येते.मुख्यत्वे या मंदिराचा इतिहास म्हणजे हे हेमदपंथ याच्या काळात सात गावचे मंदिर आणि हे मंदिर उभारल्या गेलेले आहेत.मंदिराच्या सुरवातीला आपल्याला नंदीचे दर्शन घडून येतांना दिसते.

मंदिराच्या मुख्य छतावर वर्तुळकार छत हे उभारल्या गेलेले आहेत.या वर्तुळकार आकृत्या या एकमेकांना समांतर आहेत.तद्काळातही इतके अचूक मोजमाप घेऊन या मंदिराचे बांधकाम केलेले आहे.आणि अत्यंत सुंदर असे महान शिल्पाकृती कार्य घडवून आणलेले आहे.मंदिराच्या छतावर सुंदर फुलांचे नक्षीकाम केलेले आपल्याला आढळून येते.राम-सिता वनवासाला जात असतांना या ठिकाणीही थांबल्याचे कथांमध्ये सांगितले जाते.त्यांच्या स्वागतार्थ हे फुले येथे जमविण्यात आले होते असे सांगण्यात येते.

## हेमाडपंथी मंदिरामध्ये मुख्यत्वे

१) शिखर

२) महामंडप

३) मंडप

४) अर्धमंडप

असे भाग येत असतात.या भागामधील जो नंदीचा भाग आहे तो अर्ध मंडपामध्ये येतो मंडप हा अतिशय सुंदर आणि उघड स्वरुपात आहे.मंडपावर अनेक पक्षी फुले यांचे प्रत्यक्षदर्शन आपल्याला शिल्पाव्दारे बघायला मिळते.

मंदिराच्या आतल्या भागामध्ये म्हणजे मंडपामध्ये आणि अर्धमंडपामध्ये आपण प्रवेश करतो तेव्हा अत्यंत गडद अंधार आपल्याला बघायला मिळतो मंदिराचे छत हे सुंदर नक्षीकाम केलेल्या खाबांवर उभे असलेले दिसते आणि त्यावर अत्यंत सुंदर अश्या मूर्त्या जणू काही अप्सराच आहेत.त्या आपले स्वागत करत आहेत असे भासते.मंदिरातील गडद अंधारात एक शक्ती किंवा वेगळीच उर्जा आपल्याला तेथे जाणवते मंदिराच्या आंतर गाभ्यामध्ये शिवलिंग आहे.त्या छतावर चांदण्याकृती आकृत्या कोरलेल्या आहेत.मंदिराच्या खांबावर गणपतीचे मूर्त्या आहेत ज्या अप्सरा आपल्या स्वागत करतात त्यांचे मुख हे वेगवेगळया बाजुस वळलेले आहे.

## मंदिराचे बाहयरंग

मंदिराची आकर्षकता ही त्याच्या बाहयरुपी सौदर्यांने अगदी फुलुन जातांना आपल्याला दिसून येते.मंदिराचे बाहेरचे कोरीवकाम हे अत्यंत बारीक व कलात्मक पध्दतीने केले असल्याचे आपल्याला जाणवते.गावकरी या मंदीराची एक सामाजीक भाग म्हणून अत्यंत उत्कृष्ठपणे निगा राखतांनाआपल्याला दिसून येतात.मंदिरावर घोडे,हत्ती,माणसे यांचे चित्र दिसून येतात.याव्दारे त्या काळातील दंड विधानांची प्रचिती आपल्याला याव्दारे मिळतांना दिसते .मंदिर हे ज्ञानाचे, समाजाचे, राजकारणाचे आणि अर्थकारणाचेही ठिकाण होते असे दिसून येते.

मंदिराचा शिखर हा अत्यंत मनमोहक डोळे दिपुण टाकणारा आहे.मंदिराची रचना ही त्याला नैसर्गिक आप्पती पासून बचाव करण्यासाठी मदतगार ठरते.१०००वर्षांच्या काळात या मंदिराने अनेक ऋतुंशी झुंझारपणे लढाई दिलेली आहे.

या प्रकारची कलाकृती ही फार दुर्मिळरित्या सापडते.त्याची प्राचिनता आपल्याला तद्कालीन समाज जिवणाशी जोडण्यास मदतगार ठरु शकते.

## ५) निष्कर्ष व उपाययोजना

आत्तापर्यंत आपण चिखली तालुक्यातील अनेक मंदिरांचा अभ्यास केला.त्यांचा इतिहास संस्कृती व आज त्यांची अवस्था या गोष्टी जाणून घेण्याचा प्रयत्न केला या गोष्टी जाणून घेतांना समाज व्यवस्था आणि मंदिरामधील गर्दी यांचा सुध्दा मानसशास्त्रीय पध्दतीनं अभ्यास केला असता असे दिसून येते की समुदायामध्ये ध्रुवीकरण आणि धार्मिक तेढ मोठया प्रमाणात निर्माण झालेली आहे.साकेगाव,सातगाव भुसारी,बल्लाळ देवी,रेणूका देवी या इतक्या सुदंर आणि प्राचीन इतिहास प्राप्त असणाऱ्या वास्तु आपल्या भोवतालच्या पट्यामध्ये असतांना त्यांची चिकित्सकपणे शहानिशा त्यांना जतन करण्यासाठी लागणाऱ्या कष्टाची जाण न ठेवता सर्व लोक ढोबळमानाने एका देवी रुपाने या वास्तुंकडे बघतांना दिसून येतात.

मंदिर ही मानसाने उभारलेली एक सुंदर वास्तु आहे.जेथे सर्वांचे विचार आणि मने जुळून येतात पण आपण मंदिरामध्ये का जायचे जाण्यामागे कारण काय आहे.येथे आपण मानसिक गुलाम तर होत.नाहीना हे प्रश्न आज लोकांना पडत नाही या विश्वाला एक महान उर्जा चालवते आपल्याला वैश्विक उर्जेचा नियम माहीतच आहे की,**Energy is Neither Created nor destroyed only it can transform from one from to another form** ही उर्जा एक फार चिकीत्सेचा विषय आहे.त्याला समजून घेण्याचा अनेकांनी प्रयत्न केला आणि या प्रयत्न करणाऱ्यांनीच कुणी त्याला देव म्हटले असेही भाकीत आहे.

मंदिरानी भारत देशात फार महत्वाचा असा भाग घेतला आहे .सोमनाथाच्या मंदिरावर गझनीने स्वाऱ्या करुन अमाप धनाचा साठा हस्तगत केला.

व्यवस्थेने ब्राम्हण,क्षत्रीय,वैश्य व शुद्र असे वर्ण पाडले व या वर्णाच्या आधारे प्रत्येकाला अर्थातच शुद्र वगळता सर्वांना त्यांचे विशेषाधिकार दिलेत.परंतु मंदिरामध्ये पुजा करण्याचा अधिकार फक्त ब्राम्हणांनाच दिलेला आहे

आपण समाजाचा एक भाग आहोत आणि सामाजिक कृतज्ञता म्हणून आपण समाजाचे काहीतरी देण लागतो मग आपण आपली मदत अनाथालय गोरगरिब, अपंग, NGO यांच्यापर्यंत का नाही पोहचवत मंदिरव्यवस्थेचे पाळेमुळे येथे जनामनात रुजलेले आहेत.इतिहास आणि गर्दिचे मानशास्त्र म्हणजे (Mob Psychology) जर हे आपण एकत्र केलेत तर आपल्याला भविष्यात येणाऱ्या भरपूर समस्यांचे आकलन आणि त्यावर यशात्मक पध्दतीने कसी मात करावी याचा बोध होतो.अजुनही काही मंदिरामध्ये स्त्री वर्ज्य मानतात त्यांना विशिष्ट काळात देवधर्म आनंदाचे क्षण यांच्यापासून दूर ठेवण्यात येते सबरीवाला मंदिर प्रकरणा सारखे जिवंत उदाहरण आपल्याजवळ आहे.डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाला समतेचे महत्व कळावे व आम्ही तुमचाच भाग आहोत याची जाणीव करुन देण्यासाठी काळाराम मंदिराचा सत्याग्रह केला.

हे सर्व मंदिर प्रकरण म्हणजे फार मोठे गुतांगुंतीचे आहे.उपाययोजना म्हणजे मंदिराचा उपयोग हा प्रगतीसाठी व्हायला पाहिजे भावनिक गोष्टीत अडकून राजकारणी विशिष्ट सामाजिक गट हे आपली चिकित्सक बुध्दी तर खुंटवून नाही टाकत ना याचा विचार व्हायला पाहिजे भविष्यकाळात हे सर्व देव देवता हे आपले रक्षण करतील अशी अपेक्षा ठेवुयात आणि मंदिरामुळे का होईना माणसाने माणसाशी माणसासम वागावे अशी प्रार्थना करुयात.

प्राचार्य
एस पी एम.तात्यासाहेब महाजन
कला व वाणिज्य महाविद्यालय,चिखली
जिल्हा बुलडाणा ४४३ २०१

S.P.M. Arts & Com. College Chikhli